# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 19 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १९ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलच्या वक्तव्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या कामकाजात आजही व्यत्यय आला. लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित झालं.

लोकसभेत कामकाज सुरु होताच काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघम, समाजवादी पक्षासह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी अमित शहा यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. काही सदस्यांनी हौद्यात उतरुन फलक झळकावले. त्यामुळे सभागृहाचं कामकाज तहकूब झालं. राज्यसभेतही कामकाज सुरु झाल्यावर विरोधकांनी या मुद्यावर दिलेला स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यामुळे विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

****

दरम्यान, संसद भवन परिसरात सत्ताधारी आणि विरोधकांच्या वतीनं आज आंदोलन करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा काँग्रेसकडून होत असलेल्या अपमानाविरोधात भाजपाच्या खासदारांनी आंदोलन केलं, तर बाबासाहेबांबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ इंडिया आघडीच्या वतीनं मोर्चा काढण्यात आला.

****

विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांची एकमताने निवड झाली. राम शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचं उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी जाहीर केलं. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार,

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राम शिंदे यांचं स्वागत केल, तसंच त्यांना शुभेच्छा दिल्या.

****

मुंबईत काल झालेल्या बोट दुर्घटनेप्रकरणी काँग्रेसचे नाना पटोले यांनी आज स्थगन प्रस्ताव मांडला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही यावर चर्चा करण्याची तयारी दर्शवली. या घटनेबद्दल सरकारने आजचं कामकाज संपेपर्यंत निवेदन द्यावं, अशी सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

बीड जिल्ह्यातल्या माजी सरपंचांची हत्या आणि परभणीतल्या हिंसाचाराच्या मुद्यावर विधानसभेत चर्चा आज पुन्हा सुरु झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या चर्चेला उत्तर देणार आहेत.

****

दरम्यान, अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध करत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी नागपुरातल्या संविधान चौक इथं आंदोलन केलं. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे नितीन राऊत, विजय वडेट्टीवार यावेळी उपस्थित होते.

****

जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम जिल्हातल्या कद्दर इथल्या चकमकीत पाच दहशतवादी ठार झाले. या परिसरात दहशतवादी लपून बसले असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा बलाने काल रात्रीपासून शोधमोहिम सुरु केली होती. त्यानंतर आज सकाळी ही चकमक झाली. या गोळीबारात दोन सैनिक जखमी झाले असून त्यांना वैद्यकीय सेवेसाठी हलवण्यात आले आहे.

****

केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयनं सामुहिक भ्रष्टाचार प्रकरणी काल मुंबईतून सात सरकारी अधिकाऱ्यांना अटक केली आहे. त्यांच्या कार्यालयांमध्ये आणि निवासस्थानी घातलेल्या छाप्यात २७ स्थावर मालमत्तांच्या कागदपत्रांसह एक कोटींपेक्षा जास्त रोख रक्कम ताब्यात घेण्यात आल्याचं सीबीआयनं सांगितलं. सीप्झमधलं जागा आरक्षण, आयात मालाचं वितरण आणि अन्य गैरव्यवहारांसाठी मध्यस्थांमार्फत लाच घेतल्याचा आरोप या अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे. सह विकास आयुक्त, उप विकास आयुक्त आणि दोन सहायक विकास आयुक्तांचा यामध्ये समावेश आहे.

****

केंद्र सरकारने देशातल्या सर्व शेतकऱ्यांना आधार कार्डच्या धर्तीवर ग्रीस्टॅक म्हणजे शेती असल्याचा युनिक फार्मर आयडी नंबर देण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाची १६ डिसेंबरपासून गावागावात कॅम्प लावून अंमलबजावणी करण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून बीडचे प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यात बहादरपूर इथं शिबिर घेण्यात आलं.

****

नंदुरबार जिल्ह्यात सारंगखेड्याच्या घोडे बाजारात अश्वनृत्य स्पर्धेनं आज चेतक फेस्टीवलची सुरवात झाली. यावेळी घोड्यांची मनमोहक नृत्ये पहायला मिळाली. आज सारंगखेड्याच्या अश्व बाजारात करोडो किंमतीचे घोडे दाखल होत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

केंद्रीय सार्वजनिक तक्रार निवारण तसंच निवृत्तीवेतन विभागामार्फत आजपासून सुशासन सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. या आठवड्यात आयोजित विविध शिबिरांमध्ये नागरिकांनी मोठ्यासंख्येने सहभागी होण्याचं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

पुणे इथं २० ते २२ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या बालरंगभूमीच्या पहिल्या बाल संमेलनात बीड जिल्ह्यातल्या आठ शाळेतले ३६ विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत. यामध्ये २० दिव्यांग कलावंतांचाही समावेश असल्याचं बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष  डॉ. दीपा क्षीरसागर यांनी सांगितलं आहे.

****

राज्यात थंडीचा कडाका कायम असून, नाशिकमध्ये पारा पुन्हा घसरला आहे. आज सकाळी नाशिकमध्ये आठ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस, तर निफाड मध्ये सहा पर्णांक चार अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

बीड इथं उद्या २० तारखेला एक दिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक आणि अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

****